महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर
विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४.

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Rajendranagar, Kolhapur-416 004

क्र. कोविमं/माध्य.परीक्षा/ 380
कोल्हापूर - ४१६ ००४
दिनांक - १४/०६/२०२१

प्रति,

जिल्हा क्रीडा अधिकारी
सातारा /सांगली /कोल्हापूर

विषयः-सन २०२०-२१ या वर्षात परीक्षेसाठी इ. १०वी व इ.१२ वी च्या विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुणांसाठी प्रस्ताव सादर करण्यासंबंधी मुदतवाढ देण्याबाबत

सदर्भः-१.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२२१/प्र.क्र.१७ /एस.डी.२, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२८/०५/२०२१
२.या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/७१९५ दिनांक २६/०२/२०२१
३. राज्य मंडळ, पुणे जा.क्र.रा.मं./परीक्षा-७ /३३९१ दि.११/०६/२०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचे आयोजन अनुक्रमे दि.२९/०४/२०२१ ते दि.२०/०५/२०२१ व दि.२३/०४/२०२१ ते दि.२१/०५/२०२१ या कालावधीत करण्यात आलेले होते. कोविड-१९ या रोगाच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शासन पत्र क्र.संकीर्ण-०२२१/प्र.क्र.१७/एसडी-२दि.२८/५/२०२१ अन्वये सन २०२०-२१ या वर्षात माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या बाबतीत इ.८वी,इ.९वी मध्ये सदर विद्यार्थ्याचा क्रीडा स्पर्धेतील सहभाग विचारात घेण्यात यावा व सदर विद्यार्थ्यास सन २०२०-२१ करिता गुण देण्यात यावेत.तसेच सन २०२०-२१ या वर्षात उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या बाबतीत इ.१२वी पर्वी इ.११ वी मधील विद्यार्थ्याचा क्रीडा स्पर्धेतील सहभाग विचारात घेण्यात यावा व सदर विद्यार्थ्यास सन २०२०-२१ करिता गुण देण्यात यावेत तसेच सदर सवलत ही केवळ सन २०२०-२१ च्या परीक्षेकरिताच देय राहिल असे संदर्भीय पत्रान्वये शासनाने कळविलेले आहे.

त्यानुसार सन २०२०-२१ या वर्षात परीक्षेसाठी इ.१० वी व इ.१२ वी च्या विद्यार्थ्यांना सवलतीचे गुण मिळण्याबाबतचे क्रीडा प्रस्ताव सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

| तपशील | दिनांक |
|---|---|
| विद्यार्थ्यांनी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत संबंधित जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याकडे प्रस्ताव विहीत नमुन्यात सादर करावयाचा दिनांक | शनिवार दि.१२ जून,२०२१ ते सोमवार दि.२१ जून,२०२१ |
| संबंधित जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी संबंधित विभागीय मंडळाकडे प्रस्ताव व यादी सादर करावयाचा दिनांक | मंगळवार दि.१५ जून,२०२१ ते शुक्रवार दि.२५ जून,२०२१ |

तरी वरील तारखाप्रमाणे विद्यार्थ्यांचे क्रीडा गुणाचे प्रस्ताव शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत आपणांकडे प्राप्त होतील त्या प्रस्तावाची छाननी करून गुणाच्या शिफारशीने परिपूर्ण प्रस्ताव दिनांक १५ जून,२०२१ ते दिनांक २५ जून,२०२१ पर्यंत समक्ष मंडळ कार्यालयात जामा करावेत. वेळेमध्ये प्रस्ताव जमा न झाल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

( देविदास कुलाळ)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी

सर्व मान्यता प्राप्त शाळांचे मुख्याध्यापक/ क.महाविद्यालयांचे प्राचार्य,
जिल्हा सातारा, सांगली, कोल्हापूर यांना कळविण्यात येते की , परिपूर्ण प्रस्ताव विहित कालावधीत संबंधित क्रीडा अधिकारी यांच्याकडे जमा करावेत. वेळेमध्ये प्रस्ताव जमा न झाल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीची जबाबदारी आपल्यावर राहील.याची नोंद घ्यावी